**पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालय**

**कार्यपत्रिका क्रमांक-२**

**सभावृत्तांत**

दि.- ०६/५/२०१५ वेळ -दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०६/५/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा. मोटे किरण बाळासाहेब** **सभापती**

२) मा.ननवरे जितेंद्र बाबा

३) मा.पालांडे सुजाता सुनिल

४) मा.सौ.पानसरे अमिना महंमद

५) मा.कदम सदगुरु महादेव

६) मा.कैलास महादेव कदम

७) मा.शितोळे शैलजा बाबुराव

८) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१०) मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.बरशेट्टी -कार्यकारी अभियंता पापू, मा.मकरंद निकम- कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.ओंबासे-कार्यकारी अभियंता (झोनिपू), मा.सोनवणे-उपअभियंता,विदयुत, विदयुत,मा.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, मा.शिरीष पोरेड्डी-उपअभियंता स्थापत्य, मा.क्षिरसागर-उपअभियंता स्थापत्य, श्रीमती अनघा पाठक- उपअभियंता जलनि:स्सारण,मा.रविंद्र भोकरे-सहा.आरोग्याधिकारी, मा.उगले-लेखाधिकारी, श्री.शेख-कनिष्ठ अभियंता (विदयुत), श्री.रमेश भोसले- मुख्य आरोग्य निरीक्षक,श्री.नाना मोरे- कार्यालयीन अधिक्षक, हे अधिकारी उपस्थित होते.

----

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-३ ) नामकरण करणेबाबत-,मा.सदगुरु कदम, मा. पानसरे अमिना यांचा प्रस्ताव.

विषय क्रमंक- ४) रस्त्याच्या नामफलकाच्या नुतनीकरणाबाबत - मा.पालांडे सुजाता सुनिल, मा. पानसरे अमिना यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) गतिरोधक बसविणेबाबत- मा.रमाताई ओव्हाळ, मा.सदगुरु कदम, मा. पानसरे अमिना यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) वाचनालय काढून टाकणेबाबत- मा.रमाताई ओव्हाळ मा.सदगुरु कदम, मा. पानसरे अमिना यांचा प्रस्ताव.

------

दिनांक १०/४/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्र.१ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक- ११२ विषय क्रमांक- १
दिनांक- ०६/५/२०१५ विभाग-
सुचक- मा. पालांडे सुजाता अनुमोदक-मा.कदम सदगुरु
संदर्भ -मा.क क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/१५/कावि/३५०/२०१५ दि.२०/४/२०१५

मा.क क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे---

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी क क्षेत्रीय कार्यालयाकडील अंदाजपत्रकामध्ये “खाजगी करणाद्वारे साफसफाई करणे” या लेखाशिर्षकावरील रक्कम रु. २,५०,००,०००/- ( अक्षरी र.रु. दोन कोटी पन्नास लाख फक्त) तरतुदीमधुन “कचरा राडारोडा उचलणे व हलविणे” या लेखाशिर्षकावर सन २०१५-२०१६ याकरिता रक्कम रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- ११३ विषय क्रमांक- २
दिनांक- ०६/५/२०१५ विभाग-
सुचक- मा. पालांडे सुजाता अनुमोदक-मा.कदम सदगुरु
संदर्भ -मा.क क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/१५/कावि/३२४/२०१५ दि.१३/४/२०१५

मा.क क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयातील आरोग्य् विभागाचे सन २०१४-२०१५ चे अंदाजपत्रकामध्ये कचरा राडारोडा उचलणे व हलविणे या लेखाशिर्षकावर र.रु.१०,००,०००/- (दहा लाख् ) इतकी तरतुद करणेत आलेली होती.परंतु सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये सदर लेखाशिर्षकावर ६ महिने करिता सुधारित तरतुद र.रु.२,००,०००/- (दोन लाख) इतकी दाखविणेत आलेली आहे.सदरची तरतुद पुढील सहा महिन्याचा होणारा संभाव्य खर्च दाखविणे आवश्यक होते परंतु तसे न झालेने ६ महिनेचा खर्च र.रु.६,४७,९५०/- इतका झालेला आहे. सदर लेखाशिर्षकावर तरतुद र.रु.२,००,०००/- व् खर्च र.रु.६,४७,९५०/- इतका झालेला त्यामुळे जादा झालेला खर्च र.रु.४,४७,९५०/- कमी पडणारी र.रु.४,५०,०००/- हॉटेल वेस्ट वाहतुक करणे या लेखाशिर्षकावरील सन २०१४-२०१५ मधील शिल्लक रक्कम् रु.१७,७०,०००/- मधुन वर्ग करुन् झालेला खर्च दाखविणे करिता हॉटेल वेस्ट वाहतुक करणे या लेखाशिर्षकामधील शिल्लक तरतुदीमधुन र.रु.४,५०,०००/- ही कचरा राडारोडा उचलणे व हलविणे या लेखाशिर्षकामध्ये वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

--------

ठराव क्रमांक- ११४ विषय क्रमांक- ३
दिनांक- ०६/५/२०१५
सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक-मा. पानसरे अमिना
संदर्भ -मा. सदगुरु कदम, मा. पानसरे अमिना यांचा प्रस्ताव.

**विषय - नामकरण करणेबाबत..**

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

-----

ठराव क्रमांक- ११५ विषय क्रमांक- ४
दिनांक- ०६/५/२०१५ विभाग-
सुचक- मा.पालांडे सुजाता अनुमोदक-मा.पानसरे अमिना
संदर्भ - मा.पालांडे सुजाता सुनिल, मा. पानसरे अमिना यांचा प्रस्ताव.

संततुकारामनगर येथील डॉ.डी.वाय.पाटील मेडिकल कॉलेजकडे जाणा-या रस्त्यांस व शनि मंदिराकडे जाणा-या रस्त्यास **“डॉ.पी.डी.पाटील”** असे नामकरण करण्यात आलेले आहे. सदर नामफलकाची दुरुस्ती व नुतनीकरण करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

--------

ठराव क्रमांक- ११६ विषय क्रमांक- ५
दिनांक- ०६/५/२०१५ विभाग-
सुचक- मा.सदगुरु कदम अनुमोदक-मा.पानसरे अमिना
संदर्भ - मा.रमाताई ओव्हाळ,मा.सदगुरु कदम, मा. पानसरे अमिना यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ६१ मध्ये दापोडी गावठाण बोपोडी ते शिवाजी पुतळा रस्त्यांवर मयुरवाटीका समोर व एस.टी. रोडजवळ पीडब्ल्यूडी याच रस्त्याजवळ कॉर्नरला वारंवार अपघात होत असलेने सदर ठिकाणी दोन गतिरोधक बसविण्यात यावेत.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

--------

ठराव क्रमांक- ११७ विषय क्रमांक- ६
दिनांक- ०६/५/२०१५ विभाग-
सुचक- मा.सदगुरु कदम अनुमोदक-मा.पानसरे अमिना
संदर्भ - मा.रमाताई ओव्हाळ, मा.सदगुरु कदम, मा. पानसरे अमिना यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ६१ मध्ये दापोडी गावठाणातील मनपा दवाखान्यासमोरील साई मंदिराजवळील वाचनालयाची दुरावस्था झाली आहे व त्याचा गैरवापर होत असल्याने जुने वाचनालय काढून टाकण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(मोटे किरण बाळासाहेब )
सभापती क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/६२/२०१५
दिनांक १३/५/२०१५



प्रशासन अधिकारी तथा
सचिव(सभाशाखा) क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.